मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा सक्षम प्राधिकारी यांचेसमोर

(क्र.०५/ व्हिओसी/सुनावणी/२०२६/ २११)

१. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०: महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधी किंवा तदानुषांगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम
२. महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान,आरोग्य विज्ञान,उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (तक्रारी, अपील व सुधारणात्मक उपाययोजना) नियम, २०२४, दि.०८.१०.२०२४
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग अधिसूचना दि.०७.११.२०१३
४. सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९: राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा यानुसार कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता शिक्षण व महाराष्ट्र राज्यातील इतर कौशल्य पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींचे नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तद्नुषांगिक इतर बाबींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ स्थापन करण्यासाठी व विधी संस्थापित करण्यासाठी अधिनियम

...अन्वये अर्ज

महाराष्ट्र राज्य कौशल्य,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मुलुंड ..... अर्जदार

विरुध्द

पारस कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था, अकोला ..... प्रतिवादी

१. प्रस्तावना

१.१. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० अन्वये महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास व त्याकरिता जाहिरात करण्यास मनाई करण्यात आली आहे.

१.२. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० अधिनियमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (तक्रारी, अपील व सुधारणात्मक उपाययोजना) नियम, २०२४, दि.०८.१०.२०२४ निर्गमित करण्यात आले आहेत.

१.३. सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ अन्वये महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ स्थापना करण्यात आली आहे. सदर अधिनियमानुसार कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता प्रशिक्षण मान्यता व संलग्नता कार्यवाही निर्देशीत करण्यात आली आहे.

१.४. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या अंमलबजावणी करिता उच्च व तंत्र शिक्षण विभाग अधिसूचना दि.०७.११.२०१३ नुसार मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व

प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना व्यवसाय शिक्षण संबंधी बाबींकरिता सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

२. पूर्वपीठिका

२.१. संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित पारस कौशल्य विकास संस्था, अकोला या संस्थेने हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या अभ्यासक्रमात सन २०२५-२६ या प्रशिक्षण वर्षात १०१ अतिरिक्त प्रवेश केल्याचे त्यांच्या दि.१४.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये संचालनालयास सादर केले आहे.

२.२. सदर अतिरिक्त प्रवेश अनधिकृत असल्यामुळे अर्जदार महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुलूंड, मुंबई यांनी त्यांच्या दि.०८.०६.२०२६ पत्रान्वये प्रस्तूत अर्ज, सत्यशोधन समिती अहवाल व शिफारशी संचालनालयास सादर केल्या आहेत.

३. सुनावणी

३.१. अर्जदार महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुलूंड, मुंबई व्दारे प्राप्त सत्यशोधन समिती अहवाल व शिफारशी व संदर्भीय अधिनियम व नियमावलीतील तरतूदींच्या अनुषंगाने संबंधित प्रशिक्षण संस्थेला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी उपलब्ध करुन देण्याकरिता सदर प्रकरणाची सुनावणी दि.१९.०६.२०२६ रोजी आयोजित केल्याबाबत संचालनालयाच्या दि.१८.०६.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे संस्थेस कळविण्यात आले होते.

३.२. त्यानुसार सदर संस्थेची सुनावणी मंगळवार दि.१९.०६.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात आली.

४. सुनावणीस खालील अधिकारी/ प्रतिनिधी उपस्थित होते.

४.१. श्री.योगेश सुरेश पाटील, संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मुलुंड, मुंबई

४.२. श्री. नि. आ. निकम, उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई

४.३. श्रीमती सोनम चौधरी, सहायक संचालक (तांत्रिक), संचालनालय, मुंबई.

४.४. श्री. संतोष साळुंखे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अकोला

४.५. प्रतिवादी संस्थेच्या वतीने श्री. प्रवीण भोटकर, अध्यक्ष उपस्थित होते.

५. अर्जदार व प्रतिवादी यांनी दि.१९.०६.२०२६ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान तोंडी युक्तिवाद सादर केला.

६. अर्जदार महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मुलुंड, मुंबई यांचा युक्तिवाद

संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मुलुंड, मुंबई यांनी नमुद केले की,

६.१. संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित पारस कौशल्य विकास संस्था, अकोला या संस्थेने हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या अभ्यासक्रमात सन २०२५-२६ या प्रशिक्षण वर्षात १०१ अतिरिक्त प्रवेश केल्याचे त्यांच्या दि.१४.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये संचालनालयास सादर केले आहे. सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुलुंड, मुंबई यांना संचालनालयाचे दि.२३.१२.२०२५ च्या पत्रान्वये कार्यवाही करून अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

६.२. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुलुंड, मुंबई यांनी त्याचे पत्र क्र. का.क्र.०१/मान्यता/मान्यता प्रवेश/२०२५/२६७४, दि.०४.१२.२०२५ अन्वये सदर संस्थेस सन २०२५-२६ साठी हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त प्रवेशास मान्यता देता येत नाही, याबाबत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अकोला व संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था व्दारा संचालित पारस कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था, अकोला तसेच श्री.अनुप संजय धोत्रे, मा. संसद सदस्य (लोकसभा) अकोला यांना कळविले असल्याचे दि.१२.०३.२०२६ रोजी पत्रानुसार संचालनालयास कळविले आहे.

६.३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.५/व्हीओसी/मान्यता/२०२६/१४४, दि.३०.०४.२०२६ अन्वये सदर प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश मंडळास देण्यात आले. मंडळाचे पत्र क्र.का.क्र.०१/मान्यता/२०२६प्र.क्र.७/९३६, दि.३०.०४.२०२६ रोजी त्याच दिवशी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अकोला यांना सदर संस्थेची चौकशी करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

६.४. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अकोला यांचे पत्र क्र.३६०, दि.१५.०५.२०२६ नुसार चौकशी अहवाल मंडळास सादर करण्यात आला.

६.५. सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ अन्वये नविन संस्था, अभ्यासक्रम व/ वा तुकडी सुरू करण्यापूर्वी संबंधीत संस्थेस मंडळाकडे विहित मुदतीत व नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. संस्थेकडे संबंधीत मागणी करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाकरिता प्रति तुकडी निर्देशित मानकाप्रमाणे प्रशिक्षण सुविधा जसे की, यंत्र, साधन सामुग्री, हत्यारे, जागा, विद्युत पुरवठा, इत्यादी उपलब्ध असल्याबाबत निरिक्षण समितीकडुन पडताळणी करण्यात येते. सदर निरिक्षण अहवालानुसार शासन आदेश निर्गमित करुन मान्यता देण्यात येते. मान्यता प्राप्त संस्था मंडळाकडे अनामत रक्कम जमा करतात व संबंधीत अभ्यासक्रमाकरिता निर्धारित अर्हतेनुसार निदेशकाची नियुक्ती करतात. मंडळाव्दारे मान्यता प्राप्त संस्थेस संबंधीत अभ्यासक्रमातील निर्धारित तुकड्यांना ३ वर्षाकरिता संलग्नता देण्यात येते व प्रवेशास मान्यता देण्यात येते. संस्था केवळ संलग्नीत तुकड्यांना ऑनलाईन पध्दतीने विवित मुदतीत संबंधीत अभ्यासक्रमांकरिता निर्धारित अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना प्रवेश देतात.

६.६. किमान हजेरीची अट पूर्ण करणाऱ्या प्रवेशित उमेदवारांना परीक्षा शुल्क भरल्यानंतर परीक्षा प्रवेश पत्र निर्गमित करण्यात येते व त्यांची परीक्षा मंडळाव्दारे घेण्यात येते.

६.७. उपरोक्त मान्यता व संलग्नता प्रक्रिया अवलंबुन संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित पारस कौशल्य विकास संस्था, अकोला, संस्था सांकेतांक MSB२६०४९५ या संस्थेस खालील अभ्यासक्रम राबवीण्यास शासन मान्यता व मंडळाची संलग्नता प्राप्त आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | मंजूर प्रवेश क्षमता | शासन मान्यता वर्ष |
|---|---|---|---|
| १ | ऑपरेशन थिएटर टेक्निशियन | ३०+३० = ६० | २०२१-२२ व २०२४-२५ |
| २ | रेडिओलॉजी टेक्निशियन | ३० | २०२१-२२ |
| ३ | हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर | ३०+३० = ६० | २०२३-२४ व २०२४-२५ |
| ४ | डायलिसिस टेक्निशियन | ३० | २०२३-२४ |
| ५ | डिप्लोमा इन मेडिकल लॅब टेक्निशियन | ३०+३० = ६० | २०२३-२४ व २०२४-२५ |

६.८. संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित पारस कौशल्य विकास संस्था, अकोला या संस्थेस उपरोक्त प्रमाणे मान्यता व संलग्नता प्राप्त अभ्यासक्रमांपैकी हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या अभ्यासक्रमात संस्थेने सन २०२५-२६ या प्रशिक्षण वर्षात १०१ अतिरिक्त प्रवेश केल्याचे निदर्शनास येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात आला आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | कालावधी | मंजूर प्रवेश क्षमता | एकुण प्रवेश | अतिरिक्त प्रवेश | शुल्क प्रति विद्यार्थी | एकुण अतिरिक्त शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर | १ वर्ष | ६० | १६१ | ६१ | रु.४०,००० | रु.४०,४०,००० |

६.९. मंडळाव्दारे मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ https://msbsvet.edu.in वर अनधिकृत संस्था/ अभ्यासक्रम सुरू करण्यास मनाई बाबत अधिनियम व नियमावली प्रसिध्द केली आहे. तसेच, प्रवेश प्रक्रिया वेळी विद्यार्थी व पालकांना अनधिकृत संस्था व अभ्यासक्रमांना प्रवेश घेवू नये असे आवाहन करण्यात येते.

६.१०. प्रवेशाची संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने करण्यात येते. या करिता मंडळाच्या संकेतस्थळावर विद्यार्थी, संस्था व क्षेत्रीय कार्यालय यांच्याकरिता वापरकर्ता पुस्तिका प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

६.११. संस्थेला अनधिकृत संस्था/ अभ्यासक्रम सुरू करण्यास राज्यात अधिनियमाव्दारे प्रतिबंध असल्याची व त्याबाबत परिणामांची पूर्व कल्पना असतांना देखिल संस्थेने विद्यार्थ्यांची दिशाभूल केल्याचे निदर्शनास येत आहे.

६.१२. सबब,

६.१२.१. संस्थेने अतिरिक्त तुकड्यांना शासन मान्यता व मंडळाची संलग्नता घेतलेली नसल्याने सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, प्रकरण ४, कलम २८ मधील तरतुदींचा भंग केला आहे.

६.१२.२. मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा केलेले प्रवेश हे अनधिकृत प्रवेश आहेत. सबब, सदर संस्थेने सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३(२) मधील तरतुदींचा भंग केला आहे.

६.१२.३. तसेच, सदर संस्था महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान,आरोग्य विज्ञान,उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (तक्रारी, अपील व सुधारणात्मक उपाययोजना) नियम, २०२४, दि.०८.१०.२०२४ अन्वये कार्यवाहीस पात्र आहे.

७. प्रतिवादी यांचा युक्तिवाद

प्रतिवादी संस्थेच्या वतीने श्री. प्रवीण भोटकर, अध्यक्ष यांनी नमुद केले की,

७.१. हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या अभ्यासक्रमाकरिता संस्थेस मंजुर प्रवेश क्षमता ६० आहे.

७.२. हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर अभ्यासक्रमासाठी सन २०२५-२६ या प्रशिक्षण वर्षात विद्यार्थ्यांच्या वाढत्या मागणीमुळे व स्थानिक स्तरावरील प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांच्या हितार्थ एकुण १६१ प्रवेश करण्यात आले आहेत.

७.३. तसेच, सर्व प्रवेशित विद्यार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षण घेत असून त्यांचा शैक्षणिक वर्षात व्यत्यय येऊ नये म्हणून अतिरिक्त प्रवेश नियमित करण्याची विनंती संस्थेकडून करण्यात आली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य लक्षात घेता सदर विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती केली.

८. निष्कर्ष

८.१. संस्थेला हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या अभ्यासक्रमांच्या २ तुकड्यांना शासन मान्यता व मंडळाची संलग्नता आहे.

८.२. हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या अभ्यासक्रमांची मंजुर प्रवेश क्षमता ६० एवढी आहे.

८.३. हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या व्यवसाय अभ्यासक्रमात सन २०२५-२६ करिता एकुण १६१ प्रवेश करण्यात आले आहेत. म्हणजेच मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा १०१ अतिरिक्त प्रवेश करण्यात आले आहेत.

८.४. या प्रवेशासाठी प्रति विद्यार्थी रु.४०,०००/- शुल्क आकारण्यांत आलेले आहे. असे एकुण ४०,४०,०००/- अतिरिक्त शुल्क वसुल करण्यात आले आहे.

८.५. प्रतिवादी संस्थेला अनधिकृत संस्था/ अभ्यासक्रम सुरू करण्यास राज्यात अधिनियमाव्दारे प्रतिबंध असल्याची व त्याबाबत परिणामांची पूर्व कल्पना असतांना देखिल संस्थेने विद्यार्थ्यांची दिशाभूल केल्याचे निदर्शनास येत आहे.

८.६. संस्थेने अतिरिक्त तुकड्यांना शासन मान्यता व मंडळाची संलग्नता घेतलेली नसल्याने सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, प्रकरण ४, कलम २८ मधील तरतुदींचा भंग केला आहे.

८.७. मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा केलेले प्रवेश हे अनधिकृत प्रवेश आहेत. सबब, सदर संस्थेने सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३(२) मधील तरतुदींचा भंग केला आहे. सबब, सदर अधिनियमातील प्रकरण ४, कलम १०(१) नुसार शास्तीस पात्र आहे.

८.८. तसेच, सदर संस्था महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान,आरोग्य विज्ञान,उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (तक्रारी, अपील व सुधारणात्मक उपाययोजना) नियम, २०२४, दि.०८.१०.२०२४ अन्वये कार्यवाहीस पात्र आहे.

## आदेश

१. संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित पारस कौशल्य विकास संस्था, अकोला या संस्थेने हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या अभ्यासक्रमात सन २०२५-२६ या प्रशिक्षण वर्षात मंजुर प्रवेश क्षमते पेक्षा केलेल्या १०१ अतिरिक्त प्रवेश हे अनधिकृत प्रवेश घोषित करण्यात येत आहे. सदर अतिरिक्त प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. तसेच, सदर अतिरिक्त प्रवेशित उमेदवारांची परीक्षा घेण्याची संस्थेची विनंती अमान्य करण्यात येत आहे.

२. संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था व्दारा संचालित पारस कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था, अकोला या संस्थेने अनधिकृत प्रवेश दिलेल्या १०१ उमेदवारांची प्रवेशाच्या प्रयोजनार्थ घेतलेले शुल्क व अन्य रकमा किंवा आकार संबंधितांना उमेदवारांना या आदेशाच्या ०७ दिवसांच्या आत परत करावे.

३. संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था व्दारा संचालित पारस कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था, अकोला या संस्थेने उमेदवारांना परत केलेल्या शुल्क/ रक्कमांचा तपशिल व त्यासंबंधी पुरावे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अकोला यांना या आदेशाच्या ०७ दिवसांच्या आत सादर करावे.

४. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अकोला यांनी संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था व्दारा संचालित पारस कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था, अकोला या संस्थेने उमेदवारांना परत केलेल्या शुल्क/ रक्कमांचा अहवाल संचालनालयास सत्वर सादर करावा.

५. संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था व्दारा संचालित पारस कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था, अकोला या संस्थेला रु. ५,००,०००/- ( रू.पाच लाख) एवढी शास्ती लादण्यांत येत आहे.

६. संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था व्दारा संचालित पारस कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था, अकोला भविष्यात अभ्यासक्रमास मान्यता नसतांना अश्या प्रकारे विद्यार्थ्यांना फसवणुक करणारी माहिती देऊन कोणतेही अनधिकृत प्रवेश करणार नाही, याबाबतचे हमीपत्र जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अकोला यांच्याकडे या आदेशाच्या ०७ दिवसांच्या आत सादर करावे.

७. प्रस्तुत निर्णयाची माहिती सर्व संबंधितांना कळविण्यात यावी.

या सुनावणी आदेशाबाबत संस्थेस अपील करावयाचे असल्यास सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ७ व उच्च व तंत्र शिक्षण विभाग अधिसूचना दि.०७.११.२०१३ अन्वये नियुक्त अपिलिय अधिकारी, सहसचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत अपिल करता येईल.

SATISH RUPCHAND SURYAVANSHI
Digitally signed by SATISH RUPCHAND SURYAVANSHI
Date: 2026.06.25 17:02:36 +05'30'

स्थळ: मुंबई (सतिश रू. सुर्यवंशी)
दिनांक: दि.२५.०६.२०२६ संचालक